अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# मोदींना रेल्वेपेक्षा विमानसेवेची जास्त चिंता

सामान्य माणसाच्या सुख-सोयींना जोपर्यंत महत्त्व दिले जात नाही तोपर्यंत देशाचा खऱ्या अर्थाने विकास होणार नाही. स्वातंत्र्य मिळाल्यापासून विकासाची एक बेगडी व्याख्या तयार केली गेली आणि ती तशीच राबविली गेली. औद्योगिकीकरण, कारखानदारी म्हणजेच विकास असा एक कलमी कार्यक्रम गेल्या साठ वर्षांपासून राबवला जातो आहे. परंतु हे कारखाने सामान्य माणसाला कुठल्या न् कुठल्या पद्धतीने तरी मदत करणारे आहेत का, याचा विचारच झाला नाही. कारखाने काढल्यामुळे पाच-पन्नास लोकांना रोजगार मिळतो. देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लागतो, असा एक सोयीस्कर आणि अर्धवट स्वरूपाचा ठासून प्रचार केला गेला. मात्र आज एकूण कारखानदारीचे प्रमाण आणि रोजगाराची टक्केवारी किंवा कारखानदारांच्या नफ्याचे प्रमाण आणि आर्थिक विकासाची टक्केवारी याचा अभ्यास केला तर धक्कादायक चित्र समोर येते. कोणताही कारखानदार देशाचा विकास व्हावा किंवा एखाद्या परिस्थितीची प्रगती व्हावी म्हणून कारखाना काढीत नाही. आतापर्यंत कोणीही खास अथवा देशासाठी कारखाना सुरू केला नाही. केवळ सरकारी सवलती उपटण्यासाठी काही मूठभर कारखानदारांनी आपले उखळ पांढरे करून घेतले. अक्षरश: एक रुपया वार्षिक भाडेपट्ट्याने शेकडो शकर जमिनी बड्या-बड्या उद्योगपतींना बहाल केल्या गेल्या. परंतु त्यातून मिळालेला रोजगार आणि आर्थिक उत्पन्न समाधानकारक राहिले नाही. स्पष्ट शब्दांत सांगायचे तर त्या कारखानदारीमुळे देशाचा सामान्य माणसाच्या जीवनात कोणतेही मूलभूत परिवर्तन घडून आले नाही. स्वातंत्र्यानंतर ४५ टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली राहते हे त्याचे सर्वात मोठे विदारक उदाहरण आहे. याशिवाय गरिबीत आणि मध्यमवर्गीय परिस्थितीत जीवन जगणाऱ्यांची संख्या वेगळीच आहे. त्या सर्वांची बेरीज केली तर देशातील ७० टक्के जनतेचे रोजचे जीवन हे अतिशय हलाखीचे आहे. हेच चित्र आणखीन जसेच्या तसे सांगायचे तर आजच्या मुंबईचे उदाहरण देता येईल. मुंबईच्या एकूण लोकसंख्येपैकी निम्मे म्हणजे ५० लाख जनता झोपडपट्टीत राहते. मुंबईतले ५५ लाख प्रवासी रोज लोकलने जीवाचे रान करून प्रवास करतात. या बोलक्या आकडेवारीवरून मुंबईसारख्या महानगरीतल्या तथाकथित मोठ्या कारखानदारीने सामान्य माणसाच्या जीवनात कोणता फरक पडला. कारखानदारी आली पण मूठभरांचे भले करून गेली. गेली ६० वर्षे इथला सामान्य माणूस पिढ्यान्‌पिढ्या लोकलनेच प्रवास करतोय. ही असमानता आणि गरीब-श्रीमंतीतली दरी सामान्य माणसाकडे दुर्लक्ष केल्यामुळेच निर्माण झाली.

### विमानसेवेची चिंता

आपल्या सरकारी धोरणात, व्यवहारात सामान्य माणूस कधीही केंद्रस्थानी नसतो. त्याचे आणखी एक ताजे उदाहरण आम्ही तुम्हाला सांगतो. 'सबका साथ, सबका विकास' अशी घोषणा देऊन सत्तेवर आलेल्या नरेंद्र मोदींनी जबरदस्त रेल्वे भाडेवाढ करून सामान्यांच्या कमरेत लाथ घातली. ही भाडेवाढ करण्यापूर्वी डबघाईत असलेल्या एअर इंडियाला बाहेर आणण्यासाठी दिल्लीत एक बैठक झाली. काही अधिकाऱ्यांनी एअर इंडियाचा चेहरा-मोहरा बदलणारे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन केले. नरेंद्र मोदी हे लागलीच प्रभावीत झाले आणि एअर इंडिया किंवा विमान प्रवास सामान्य माणसालाही परवडला पाहिजे, अशी कनवाळू भूमिका मांडली. एअर इंडियाचे बोधचिन्ह असलेला महाराजाचे चित्र बदलण्यात यावे. पूर्वी महाराजाचे ते चित्र म्हणजे एअर इंडिया किंवा विमान प्रवास हे श्रीमंत किंवा शाही लोकांसाठी असल्याचे मानले जात होते. महाराजांचे चित्र त्याचेच निदर्शक आहे, असे मोदींनी म्हटले आणि आता हा महाराजा बदलून त्याठिकाणी या विमानसेवेच्या बोधचिन्हात सामान्य प्रजा यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत. परंतु मोदींना ढासळणाऱ्या विमानसेवेची जितकी चिंता वाटते तितकी दिवसेंदिवस कोसळणाऱ्या रेल्वेसेवेची वाटत नाही हेही सहजपणे लक्षात येते. महाराजाच्या जागी सामान्य प्रजा असा बदल व्हायचा तेव्हा होईल किंवा विमान प्रवास सामान्य माणसाच्या जेव्हा आवाक्यात येईल तेव्हाची गोष्ट तेव्हा! परंतु आजची रोजची रेल्वे प्रवासाची परिस्थिती सुधारणे जास्त गरजेचे आहे. ज्या रेल्वेने रोज लाखो प्रवासी रोज प्रवास करतात त्याला तुम्ही महत्त्व देणार की, काही हजार लोक रोज प्रवास करणाऱ्या मूठभरांच्या विमान प्रवासाची चिंता करणार! विमानसेवा सुधारली पाहिजेच. परंतु त्यापेक्षा तातडीने रेल्वे सेवा रुळावर आणली गेली पाहिजे.

### लाखोंसाठी सुविधा कोटींकडे दुर्लक्ष

ही अगदी ताजी उदाहरणे आहेत. आणि जी सामान्य माणसापेक्षा श्रीमंतांचा विचार करणारी आहेत. गेल्याच वर्षी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन झाले. हे विमानतळ एवढे चकाचक आहे की, ते पाहिल्यावर आपण भारतात आहोत की परदेशाच्या एखाद्या श्रीमंत देशाच्या विमान तळावर आहोत असा प्रश्न पडतो. केवळ पाच वर्षांत दहा हजार कोटी खर्चून अगदी विमान वेगाने या विमानतळाचे बांधकाम पूर्ण झाले. ज्या विमानतळावरून महिन्याला केवळ २५ ते ४० लाख लोकं प्रवास करतात त्यांचे विमान भाडे भरलेले लाखो रुपये असेल. परंतु त्याच मुंबईत रोज ५५ लाख लोक लोकलने प्रवास करतात आणि तेदेखील रोज सर्व मिळून तेवढेच भाडे मोजतात. त्या सामान्य माणसासाठी एकही रेल्वे स्टेशन सुख-सोयींनी परिपूर्ण नाही. तिकिटांच्या रांगा, प्रसाधनगृहातली दुर्गंधी, रेल्वे ट्रॅकवर कचऱ्याचे ढीग, स्टेशनवर प्रचंड अस्वच्छता आणि जनावरांप्रमाणे माणसे कोंबून वाहणाऱ्या लोकल बघितल्यावर या देशात सामान्य माणसाच्या ना जीवनाला मोल आहे ना सामान्य माणसाच्या जीवनाला किंमत आहे. जी ध्येयधोरणे राबविली जातात ती महाराजांसाठी असतात. सामान्य प्रजा कोणाच्या खिजगणतीत नसते. एअर इंडियाचा कारभार सुधारावा यासाठी नरेंद्र मोदींकडे वेळ आहे. त्याचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन बघून त्यात सुधारणा करण्यासाठी त्यांच्या सरकारकडे पैसा आहे. परंतु अगदी त्यांच्याच राज्यातला वापी-बलसाडपासून हिमालयामधल्या कालका-सिमला रेल्वेपर्यंत किंवा मुंबईतल्या लोकल सेवेपर्यंत अतिशय वाईट परिस्थितीत प्रवास करणाऱ्या लोकांसाठी त्यांच्याकडे वेळ दिसत नाही. विमानसेवेपेक्षा त्यांनी सामान्य माणसाच्या रोजच्या जीवनाशी संबंधित आणि लाखो प्रवाशांशी संबंधित गोष्टींकडे प्राधान्याने लक्ष दिले तरच 'सबका साथ, सबका विकास' ही घोषणा सत्यात येईल. कारखानदारी आणि कारखानदारांच्या सोयीसाठी विमान प्रवास अशाच गोष्टींना आतापर्यंत महत्त्व मिळत गेले. तोच प्रवास आताही सुरू राहिल असे दिसते. तसे नसते तर ही कमरतोड रेल्वे भाडेवाढ झालीच नसती आणि मोदींनी रेल्वे सेवेचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनऐवजी विमानसेवेच्या महाराजा स्टाईलचे प्रेझेंटेशन पाहिलेही नसते.